**जिल्हा परिषद अहिल्यानगर अंतर्गत सर्व कार्यालयांमध्ये वीज वापर मर्यादित व दक्षतेने करण्याबाबत...**

**परिपत्रक**

**जिल्हा परिषद अहिल्यानगर**

**सामान्य प्रशासन विभाग-१**

**जा.क्र/साप्रवि-१/रवका/२८६/२०२५**

**अहिल्यानगर दिनांक- २९/०७/२०२५**

जिल्हा परिषद अहिल्यानगर अंतर्गत प्रत्येक शासकिय कार्यालयामध्ये अधिकारी व कर्मचारी जागेवर नसताना कार्यालयामधील लाईट, फॅन, संगणक व प्रिंटर इत्यादी विदयुत साहित्य चालु असतात असे पाहणीमध्ये आढळून आले आहे. त्यामुळे सर्वांना कळविण्यात येते की, सध्या जिल्हा परिषद अंतर्गत विविध कार्यालयांमध्ये वीज वापर अत्याधिक प्रमाणात होत असून त्यामुळे वीज खर्चात लक्षणीय वाढ झाली आहे. कार्यालयीन वीज वापरात काटकसर करणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. शासनाच्या ऊर्जा बचत धोरणानुसार व आर्थिक शिस्तीच्या दृष्टीने, विजेचा अपव्यय टाळणे व नियोजित वापर सुनिश्चित करणे गरजेचे आहे. त्यासाठी खालील **मार्गदर्शक सूचना** व **कार्यालयीन उपाययोजना** अंमलात आणणे अनिवार्य आहे.

**त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे निर्देश दिले जात आहेत –**

१. सर्व कार्यालयीन इमारतींमध्ये दिवसा नैसर्गिक प्रकाशाचा जास्तीत जास्त उपयोग करावा. अनावश्यक दिवे, पंखे, एसी आणि इतर उपकरणे सतत सुरू ठेवू नयेत.
२. काम संपल्यानंतर किंवा जागेवर नसताना सर्व वीज उपकरणे बंद करणे संबंधित कर्मचाऱ्यांची जबाबदारी राहील.
३. संगणक व प्रिंटरसारखी उपकरणे निष्क्रिय स्थितीत असल्यास त्यांचा पॉवर सप्लाय बंद ठेवावा.
४. भोजन वेळ किंवा मिटिंग दरम्यान कार्यालयामधील उपकरणे सुरू ठेवू नयेत.
५. कार्यालयीन वेळेनंतर व सुट्टीच्या दिवशी वीज उपकरणांचा अनावश्यक वापर झाल्याचे निदर्शनास आल्यास संबंधितस जबाबदार धरले जाईल.
६. जुन्या आणि जास्त उर्जा वापरणाऱ्या उपकरणांची स्थिती तपासून त्यांची जागा नवीन उपकरणांनी भरून काढावी.वरील निर्देशांचे काटेकोर पालन करण्यात यावे.

कोणत्याही प्रकारची निष्काळजीपणा अथवा अंमलबजावणीत दिरंगाई आढळल्यास संबंधित अधिकारी / कर्मचारी यांच्या विरुद्ध प्रशासनस्तरावर योग्य ती कारवाई करण्यात येईल.

सदर परिपत्रक अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या https://nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असुन त्यांचा सकेतांक क्रमांक 202507290401 38-- असा आहे.

Signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 06-08-2025 20:55:58

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

१.खाते प्रमुख (सर्व), जिल्हा परिषद अहिल्यानगर

२.गटविकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व),जिल्हा अहिल्यानगर